# भारताचा विसाव्या शतकातील तानसेन – पंडित भीमसेन जोशी

## (८५ व्या वाढदिवसानिमित्त गौरवांजली)

रमेश वाघमारे, ऑटवा, ON (पूर्वार्ध)



१९५६च्या मार्चमधे आमच्या बडोद्यातील वाङ्मय मंडळाने तीन दिवसांचा एक सांस्कृतिक समारोह साजरा केला. पु.ल.देशपांडे अध्यक्ष व प्रमुख वक्ते. त्याशिवाय नाटक, विविध मनोरंजनाचे कार्यक्रम व शेवटी पंडित भीमसेन जोशी ह्यांचे शास्त्रीय गायन होणार होते. माझा वर्गमित्र गो.पु.देशपांडे (सध्या महाराष्ट्राचे नामवंत नवनाटककार व विचारवंत) ह्याने समारोहाचे तिकीट काढले होते. पण शास्त्रीय संगीतात त्याला रस नव्हता. म्हणून त्याने त्याची प्रवेशपत्रिका मला दिली. वास्तविक मीसुद्धा त्यावेळी मुख्यतः सिनेसंगीत, गझल, कव्वाली हे धमाका संगीत-प्रकार ऐकत असे. पण 'न्यायमंदिर सभागृह' चालत जाण्याच्या अंतरावर असल्याने सोयीचे होते.

मला दुसऱ्या रांगेत जागा मिळाली. माझ्या पुढच्यातील पहिल्या रांगेत मधल्या खुर्चीवर पु.ल. बसले होते. "भीमसेन हा किराणा घराण्याचा आहे," ते त्यांच्या शेजारी बसलेल्या सुटातल्या गृहस्थाला सांगत होते. तेव्हा माहीत नव्हते, पण आता माहीत आहे की संगीत घराण्यांची नांवे त्या त्या घराण्याच्या आद्य गायकाच्या गांवांवरून पडली आहेत. किराण्याचे आद्य गायक अब्दुल करीम हे पंजाबमधील 'किराणा' गांवचे होते.

भीमसेन मंचकावर आले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. श्रोत्यांना नमस्कार करून ते कलाकुसरीने सजविलेल्या मखमली बैठकीवर बसले. "काय चिकणा माणूस आहे!" - माझ्यामागून कुणीतरी नोंद केली. सडपातळ शरीरयष्टी, तेजःपुंज कांती, हसरा उमदा चेहरा व डोक्यावर दाट कुरळे केस. त्यांनी अंगात साधा लेंगा-झब्बा घातला होता, पण त्यातही ऐट होती. प्रत्येक हालचाल आत्मविश्वासाची ग्वाही देणारी होती. स्वागताध्यक्षांनी त्यांचा परिचय करून दिल्यावर त्यांनी हार्मोनियम-वादक अप्पासाहेब जळगावकर व तबला-वादक चंद्रकांत कामत ह्यांना हळू आवाजात काही सूचना केल्या. त्या दोघांनी माना हलविल्या. मग डाव्या हातावरचा झब्बा थोडा वर ओढून त्यांनी डोळे मिटले व खाली मान घातली. धनुर्धारी उजव्या हाताने दोरी खेचून डावा हात धनुष्याच्या कमानीवर ठेवतो तसा आविर्भाव करून त्यांनी "दा ऽऽ" अशी अगदी संथ पण खुल्या आवाजात आलापी सुरू केली. "राग शुद्धकल्याण!" - कुणीतरी मागे पुटपुटले.

तो स्वर कंठातून येत नव्हता, तर हृदयातून! त्यात घुमारा, गोलाई व आर्जव होते. खडक फोडून वाहता केलेल्या झऱ्याचे पाणी पठारावर सहज वाहणाऱ्या झऱ्यापेक्षा जास्त गोड व निर्मळ असते, तसेच त्यांनी मूळचा जाड आवाज अथक रियाझाचे प्रहार करून तो वाहता, लवचिक व नारळाच्या पाण्यासारखा मधाळ केला होता.

आलापीच्या पहिल्या भागात - ज्याला अस्ताई म्हणतात - त्यांनी "मौंदर बाजो रे बाजो रे" ह्या महमंदशा रंगीले ह्या जुन्या संगीतकाराच्या बंदिशीवर (म्हणजे गीतावर) गुंजन सुरू केले. जवाहिरी (हिऱ्यामाणकांचा व्यापारी) हिऱ्याचे पैलून् पैलू उलगडून दाखवितो, तसे त्यांनी प्रत्येक स्वराचे अंगभूत भावसौंदर्य दाखविले. प्रत्येक स्वराला त्याचा 'मूड' असतो हे मला पहिल्यांदाच कळले. माझे मन एकदम शांत झाले व मी डोळे मिटले.

अस्ताईनंतर त्यांनी स्वर उंचावून वरच्या पट्टीत आलापीचा दुसरा भाग - ज्याला अंतरा म्हणतात - सुरू केला. त्यात बंदिशीच्या पुढील ओळी होत्या. "महमंदशा पिया मनके दरसवा, सदानंद घर काज". अगदी थोड्याशा जलद लयीत त्यांनी स्वरांचे पलटे अशा भावनोत्कट कल्पकतेने घेतले की मी धुंद झालो. मधूनच एखादी तान येई. राग, लोभ, द्वेष वगैरे विकार माझ्या मनातून जाऊन मन स्वच्छ झाले. ज्याला हा अनुभव घ्यायचा असेल त्याने musicindiaonline.com ह्या वेबसाईटवर भीमसेनजींचा 'शुद्धकल्याण' किंवा 'मियाँकी तोडी' हा राग ऐकावा. ह्या वेबसाईटवर तुम्हाला सर्व गायनप्रकार व कलाकार ऐकायला मिळतील. असो.

आलापी संपल्यावर त्यांनी "रसभिनी भिनी आ" ही बंदिश (ह्याला 'चीज'ही म्हणतात) द्रुत लयीत फुलबाज्या उडवाव्यात तशी सुरू केली. स्वरलयींचे ते विराट पण प्रमाणबद्ध आकृतीत रेखाटलेले नर्तन पाहून मी स्तिमित झालो. त्यांच्या ताना हृदयातून स्फुल्लिंगासारख्या गदगदून बाहेर येत होत्या. पण प्रत्येक स्वर स्पष्ट व दाणेदार. मधूनच एखादी तान जेट विमानामागे धावणारी धुराची रेषा ज्याप्रमाणे न संपता चालूच रहाते त्याप्रमाणे न संपता इतका वेळ चाले, की त्यांच्या दमसासाचे आश्चर्य वाटावे. श्रोत्यांना रिझविणाऱ्या अशा अनेक चमत्कृती दाखवून भीमसेनजींनी शुद्धकल्याण संपवला. मी घड्याळाकडे पाहिले. दीड तास होऊन गेला होता.

मध्यंतर असल्यामुळे भीमसेनजी मंचकावरून खाली उतरले व सरळ पु.ल. बसले होते तेथे आले. "चला चहा घ्यायला" ते म्हणाले. पु.ल. डोळे मिटून ध्यानस्थ बसले होते. भीमसेनजींच्या निमंत्रणाला उत्तर देताना ते तसेच बसून राहिले. "भीमसेन! काय बेहतरीन मुष्किल जमवला रे शुद्धकल्याण!" भीमसेनजी हसले. "तुला आवडला ना? बस्स. आपलं काम झालं. चल आता."

मध्यंतरानंतर भीमसेनजींनी राग हिंदोल-बहारमधे (बंदिशः "कलियनसंग करता रंग रलिया") छोटा ख्याल म्हणजे साधारण वीस एक मिनिटांचा - म्हटला. त्यानंतर एक ठुमरी ("कौन अलबेली नार नैना रसीले") व शेवटी भैरवी ("बिन देखे परे नाही चैन") म्हटली. मैफल संपली तरी श्रोते टाळ्यांच्या तालबद्ध ठोक्यात "वन्स् मोअर! वन्स् मोअर!"चा गजर करून त्यांना उठू देईनात. मग

भीमसेनजींनी हंसून "पुन्हा केव्हा तरी" असे म्हटले व ते खाली उतरले.

ह्या मैफिलीनंतर भीमसेन हे माझे शास्त्रीय संगीतातील दैवत झाले. बडोद्याच्या रसिकांवर त्यांनी अशी काही मोहिनी घातली होती की दर तीनचार महिन्यांनी त्यांना आमंत्रण जाई. आम्ही न चुकता हजर. पुढे पाचसहा वर्षांनी मी पुढील शिक्षणासाठी बाल्टिमोरला गेलो व ते आटोपून व्यवसायानिमित्त ऑटवा, कॅनडा येथे स्थायिक झालो. बरोबर भीमसेनजींच्या सर्व 'लॅांग प्ले' रेकर्ड्स् (LP), 'एक्स्टेंडेड प्ले' रेकर्ड्स् (EP), बाजारात उपलब्ध असलेल्या टेप्स व मित्रांनी कुठून तरी हातचलाखी करून आणून दिलेल्या लाइव्ह कॉन्सर्ट्स्च्या टेप्स असा खजिना होताच.

काय योगायोग असतो पहा! १९६९ साली माझे लग्न ठरले. लग्न ठरल्यावर मला कळले, की माझे श्वशुर श्री. आप्पासाहेब पारुंडेकर हे भीमसेनजींचे खास मित्र आहेत. मी थोडी सूचना करताच ते भीमसेनजींकडे गेले. अखिल भारतीय कीर्तीचा तो थोर गायक केवळ आपल्या मित्राच्या शब्दाचा मान राखण्यासाठी मैफलीस बिनशर्त तयार झाला. ही मैफल पुण्याच्या रसिकांसाठी खुली होती. भीमसेनजींनी अगदी रंगात येऊन 'शुद्धकल्याण' व 'दरबारी' हे राग सजविले व शेवटी 'अवघाची संसार' ह्या ज्ञानोबाच्या पदाची ललकारी मारून ते रंगवून रंगवून म्हटले. गेल्या वर्षीच पंडितजींचे पट्टशिष्य व ख्यातनाम गायक श्रीकांत देशपांडे त्या मैफलीबद्दल बोलत होते. ते म्हणाले, "गुरुजींच्या संस्मरणीय मैफलींपैकी ती एक होती. पण आणखी एका कारणाकरिता ती माझ्या लक्षात आहे." "ती कोणती?" मी विचारले. ते म्हणाले, "त्यावेळी गुरुजींनी मला पहिल्यांदा त्यांच्यामागे बसून तंबोऱ्यावर साथ करण्याची संधी दिली."

भीमसेनजी त्यावेळी मध्यभागी चौक असलेल्या एका दुमजली घराच्या दुसऱ्या मजल्यावर दोन खणांच्या बिऱ्हाडात रहात होते. ह्या गोष्टीचे मला वाईट वाटले. आप्पासाहेबांना विचारता त्यांनी खुलासा केला. "त्यांनी एक ऐसपैस प्लॉट घेऊन ठेवला आहे व पैसेही भरपूर आहेत. पण त्यांचे कार्यक्रम इतके एकामागून एक लागलेले असतात की घर बांधायला काही त्यांना वेळ मिळत नाही."

आणखी तीनचार वर्षांनी मी भारतात आलो तेव्हा चित्र बदलून गेले होते. आता ते एका तीन मजली प्रासादतुल्य घरात रहात होते. आजूबाजूला फुलाफळांनी बहरलेली विस्तीर्ण बाग होती. घराच्या एका बाजूला नोकराचाकरांना राहण्यासाठी खोल्या बांधलेल्या होत्या. बाहेर दोन गाड्या उभ्या होत्या. एक मर्सिडीज् व दुसरी इंपाला. त्यांचा आवडता कुत्रा गवतावर फुट्बॉलशी खेळत होता. एकूण विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ गायकाला शोभेल असा थाट होता. पण ऐश्वर्याच्या आणि कीर्तीच्या ह्या सिंहासनावर बसण्यापूर्वी त्यांना कुठल्या दिव्यातून जावे लागले हा वृत्तांत वाचल्यावर त्यांच्या 'Never say die' ह्या वृत्तीची कल्पना येते.

भीमसेनजींचा जन्म ५ फेब्रुवारी १९२२चा. (म्हणजे लवकरच त्यांचा ८५ वा वाढदिवस साजरा होणार)! तो रथसप्तमीचा दिवस होता. जन्मस्थान गदग हे कर्नाटकातील एक लहान गाव. वडील गुरुराज हे शाळेत शिक्षक असून फावल्या वेळात बी.एड.चा व एम. ए.चा अभ्यास करीत होते. उद्देश हा, की पुढची वेतनश्रेणी सहज मिळावी. भीमूने आपल्यासारखेच खूप शिकून एक विद्वान शिक्षक व्हावे एवढीच त्यांची इच्छा होती. पण हे मूल जन्माला आले तेच संगीताची आवड घेऊन. त्याच्या आईचा - रमाबाईंचा - गळा गोड होता. त्या गाऊ लागल्या की हे पोर एकाग्रतेने ऐके. मंदिरात गेले की प्रसादापेक्षा भजनाकडे लक्ष जास्त. तो पाच वर्षांचा असताना दारावरून एक लग्नाची वरात वाजत गाजत गेली. हे चिरंजीव त्यामागून चालत गेले व शेवटी थकून एका घराच्या ओट्यावर जाऊन झोपले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या दयाळू घरमालकाने त्याला घरी पोहोचविले.

गुरुराजांनी भीमू नऊ वर्षांचा होईपर्यंत त्याला 'मार्गी लावण्याचा' आटोकाट प्रयत्न केला. पण "सप्त सूरोंने निकम्मा कर दिया भीमसेन!" हे त्यांना कळून चुकले. "संगीत तर संगीत! कशात तरी दिवे लावू दे" असा विचार करून त्यांनी त्याला एक पेटी आणून दिली व संगीत शिक्षकही नेमला. कोण? तर त्यांचाच धोबी चिन्नप्पा. ह्या अवलियाने पं. पंचाक्षरी व उस्ताद इनायतखान अशा मातब्बर गायकांकडे उमेदवारी केली होती. पण तीव्र ग्रहणशक्ती व ध्वनिमुद्रण यंत्रासारखी स्मरणशक्ती हे दोन गुण जन्मजात असलेल्या भीमसेनने तीन महिन्यातच त्या परटाच्या रागदारीची पोतडी रिकामी केली.

"जोशांचा भीमू वयाच्या मानाने तयारीने गातो" ही बातमी गदगमधे पसरली. साहजिकच पं. नेहरू एका समारंभासाठी गदगला आले असता राष्ट्रगीत गाण्याचा मान त्याला मिळाला. त्याच्या लहान लहान बैठकीही होऊ लागल्या. अशाच एका बैठकीत पंचाक्षरीबुवांनी त्याचे गाणे ऐकले. "ह्या मुलाला एखादा चांगला घरंदाज गायकी गाणारा गुरू पाहिजे!" - ते गुरुराजांना म्हणाले. पण त्या लहान शहरात कुठला आला आहे असा गुरू?

भीमसेन अकरा वर्षांचा असताना त्याने एक अविस्मरणीय जलसा ऐकला. तो ऐकून "कसं गाता आलं पाहिजे?" ह्या प्रश्नाचे उत्तर त्याला मिळाले. गायक होते रसिकांचे आवडते रामभाऊ कुंदगोळकर उर्फ सवाई गंधर्व. ते संगीतातील किराणा घराण्याचे गायक असून त्या घराण्याचे एक प्रवर्तक उस्ताद अब्दुल करीमखाँ ह्यांचे शिष्य होते. किराणा घराण्याची गायनवैशिष्ट्ये मी वर भीमसेनजींच्या मैफलीचा साद्यंत वृत्तांत लिहिला आहे त्यात दिली आहेतच. रुबाबदार फेटा घातलेले रामभाऊ मंचकावर आले तेव्हाच श्रोत्यांना हर्षाचे भरते आले. त्यांनी राग शुद्धकल्याण, नाट्यगीते व भजने गाऊन शेवटी खास लोकाग्रहास्तव त्यांचे गाजलेले 'रामरंगी मन रंगले' हे भजन म्हटले. भीमसेनला स्वप्ननगरीत गेल्यासारखे वाटले. गावं तर असं!

शक्य असते तर भीमसेन तेव्हाच सवाई गंधर्वांचा शागीर्द झाला असता. पण त्यांच्याकडे शिकायचे ते मैफल कशी जिंकावी ह्याचे तंत्र. त्यासाठी काही राग तरी आपल्याला सांगोपांग आले पाहिजेत. नुसतं सारेगम गायला गेलो तर दोनतीन दिवसांत ते हाकलून देतील. दुसरे म्हणजे त्यांनी भरमसाट फी मागितली तर? आपले वडील पडले शाळा मास्तर! त्यांना कसे परवडणार? यावर एकच उपाय आहे. तो म्हणजे कुठेतरी पळून जाऊन स्वतःच्या हिंमतीवर शिकणे.

भीमसेनच्या सुदैवाने (व जोशी कुटुंबाच्या दुर्दैवाने!) तशी संधी लवकरच आली. १९३३च्या ऑगस्ट महिन्यात गुरुराज बी.टी.च्या परीक्षेसाठी म्हैसूरला गेले. इकडे त्यांचे चिरंजीव मुंबईच्या

गाडीत चढले. बरोबर थोडे कपडे आणि खिसे रिकामे. तिकीट कलेक्टर आला की कधी संडासात लपणे, कधी त्याला गाणे म्हणून दाखवून "मी एक गरीब शौकीन असून मोफत संगीत विद्यालय शोधायला गावोगावी भटकत आहे" असे सांगणे, तर कधी "माझे काका रेल्वेत बडे अधिकारी आहेत" ह्या वस्तुस्थितीचा बडेजाव मारणे. कधी कधी एखादा नियमबहाद्दर त्याला पोलिसाकडे देई. मग काय? दोन दिवस सरकारी पाहुणे!

भीमसेन मुंबईला पोहोचला व त्या जनसागरातील एक बिंदू झाला. कुणीही थारा देईना म्हणून मजुरी करून पोट भरू लागला. पण संगीत शिकविणारे कुणी भेटेना. कंटाळून तो दक्षिणेत विजापूरला गेला. तेथे मजुरीही मिळेना. एके दिवशी तहान-भुकेने कातावलेला हा अकरा वर्षाचा मुलगा एका मशिदीजवळून जात असता चक्कर येऊन पडला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या देवमाणसाने त्याला उचलून घरी नेले व गदगला पोहोचविण्याची व्यवथा केली तो विजापूरमधील धनिक संगीत-रसिक होता. भीमसेनजींना बरीच प्रसिद्धी मिळू लागल्यावर ते या देवमाणसाचा नेहमी उल्लेख करीत.

पहिले पलायन अयशस्वी झाले म्हणून भीमसेन निराश झाला नाही. उलट त्याने त्यापासून धडा घेतला. तो हा, की ज्या शहरात खानदानी गायक व संगीताचे आश्रयदाते असतील तेथेच जायचे. त्याकाळी अशी शहरे म्हणजे पुणे, ग्वाल्हेर, कलकत्ता, दिल्ली व जालंदर. पलायनाच्या संधीची भीमसेन वाट पाहू लागला. एका महिन्यातच ती संधी चालून आली.

गुरुराज एम.ए.च्या परीक्षेसाठी मुंबईला गेले व एका दिवसानंतर त्यांचे चिरंजीव पुण्याच्या गाडीत बसले. पुण्यात मैफलीत रंग जमविण्याबद्दल ख्याती असलेले 'रंगमूर्ती' गायक मास्तर कृष्णराव रहात होते. त्यांच्याकडे आश्रय मिळून गाणे शिकता येईल का हे विचारण्यासाठी भीमसेन त्यांच्याकडे गेला. आश्रय देण्याचे तर राहोच, मास्तरांनी नुसते शिकविण्याचीच जबर फी मागितली. भीमसेन थोडे दिवस राहून ग्वाल्हेरला गेला.

सध्याचे ग्वाल्हेर पाहून विश्वास बसणार नाही, पण त्यावेळी ग्वाल्हेर हे संगीताचे आगर समजले जाई. अनेक गायक, वादक व संगीतप्रेमी श्रीमंत लोक तेथे रहात. सबंध भारतात कीर्ती असणाऱ्या दोन कलाकारांना शिंदे राजांनी आश्रय दिला होता. ते म्हणजे सरोदिये उस्ताद हाफिझ अली खाँ व गायक पं. राजाभैय्या पूछवाले. हाफिझ अली गायनही शिकले होते तर राजाभैय्या रागदारी संगीता-व्यतिरिक्त टप्पा, ठुमरी, कजरी वगैरेत पारंगत होते. शिंदे राजांच्या अन्नछत्रातून पूर्ण वेळ संगीत शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना दुपारचे भोजन विनामूल्य मिळे. मात्र त्यासाठी त्या दोन कलाकारांपैकी एकाचे प्रशस्तिपत्र लागे.

ग्वाल्हेरला पोहोचल्यावर भीमसेन हाफिझ अली व राजाभैय्यांना भेटायला गेला. राजाभैय्यांनी त्याची चाचणी घेऊन त्याला अन्नछत्रासाठी पत्र दिले. संध्याकाळच्या जेवणाची खात्री नसल्यामुळे तो दुपारीच भरपूर जेवून घेई. अशा प्रकारे पोटाचा प्रश्न सुटला, पण रागदारी विद्येचे काय? दोघेहि बुजुर्ग कलाकार आपापले कार्यक्रम करण्यात व आपल्या जुन्या शागीर्दांना विद्यादान देण्यात गर्क असत. शेवटी भीमसेन त्यांच्या खनपटीवर बसला. मग हाफिझ अलींनी त्याला आपल्या घरी ठेवून घेतले व मारवा व पूरिया हे दोन राग शिकविण्यास आरंभ केला. राजाभैय्यांनी त्याला ठुमरी, टप्पा वगैरे गानप्रकारातील अस्सल नमुने शिकविले.

ग्वाल्हेरला भीमसेन आठदहा महिने राहिला. राजाभैय्यांनी मग त्याला खरगपूरला जाऊन आपल्या एका विद्यार्थ्याकडून पुढील शिक्षण घेण्याची सूचना केली. तेथे तो थोडेफार शिकला; पण तो विद्यार्थी आपल्याच शिकवणीच्या व्यवसायात व्यग्र होता. त्याने तसे भीमसेनकडे दुर्लक्षच केले. त्यातल्या त्यात सुदैव असे की एका दयाळू हलवायाशी भीमसेनची मैत्री झाली व त्याने त्याच्या रहाण्या-जेवण्याची सोय केली. भीमसेनने जेव्हा तेथून प्रयाण करण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा त्याच मित्राने त्याला नुकत्याच प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या पहाडी सन्याल या गायक-नटाकडे कलकत्त्यास जाण्यास सांगितले. ग्वाल्हेर काय आणि कलकत्ता काय? स्वनियुक्त रेल्वेमंत्री भीमसेनला गाडीने कुठेच जाण्यास मज्जाव नव्हता. तो कलकत्त्याला सन्यालच्या घरी जाऊन राहिला.

सन्यालच्या हातात त्यावेळी चारपाच चित्रपट होते. तो सबंध दिवस शूटिंगमधे दंग असे. रिकाम्या वेळात मित्र जमवून पार्ट्या करी. घरात इतर नोकर असूनही त्याने भीमसेनला स्वयंपाकी व हरकाम्या म्हणून ठेवून घेतले. भीमसेनने तगादा लावल्यावर त्याने त्याला गांधारी रागातील 'मालनिया, अब गुंद लावो' ही खानदानी चीज शिकविण्यास सुरुवात केली. भीमसेन ही चीज शिकला, पण पुढे ती तो आपल्या कुठल्याही मैफलीत गायला नाही. सन्यालच्या मनात ह्या देखण्या युवकाला सिनेनट करायचे होते, पण भीमसेनने त्याला नकार दिला. आठदहा महिन्यांनी सन्यालने त्याला थोडे पैसे देऊन त्याची रवानगी केली. भीमसेन मोठा गायक झाल्यावर सन्यालने कलकत्त्यास त्याचे गाणे ऐकले व भारावून जाऊन तो भीमसेनचे अभिनंदन करण्यास स्टेजवर गेला. भीमसेनने आपण कोण आहे हे सांगताच सन्यालने भूत पाहिल्यासारखा चेहरा केला.

कलकत्त्याच्या रस्त्यावर भटकंती करताना भीमसेनला एक गृहस्थ भेटला. त्याने "नसीर अहंमद हा किराणा घराण्याचा गायक दिल्लीमधे राहतो" अशी माहिती दिली. चलो दिल्ली! पण नसीर अहंमद ह्यांनी 'सबसे बडा रुपैया' ह्याच तत्त्वाची री ओढली. आता बहुतेक शहरे हिंडून झाली होती. फक्त एक राहिले होते - जालंदर.

भीमसेन जालंदरला पोहोचला. तेथे जाताच त्याला एक आनंदाची बातमी कळली. मंगतराम नावाचा एक अंध गायक एका धनाढ्य गिरणीमालकाच्या आश्रयाखाली राहून संगीताचे फुकट शिक्षण देत होता. भीमसेनची गाण्यातील प्रगती व उत्साह पाहून त्या गिरणीमालकाने त्याच्यासुद्धा रहाण्याची व भोजनाची व्यवस्था केली. संध्याकाळचे जेवण त्याच्याच वर्गातील एका मित्राचा हलवाई बाप उदारतेने देई.

भीमसेन सकाळी उठून थंड पाण्याने आंघोळ करून शेकडो जोर-बैठका मारी. मग दूध, मावा व नमकीन खाद्यपदार्थांची न्याहरी. त्यानंतर संगीत शाळा. मुंबई-विजापूरच्या मानाने इथे चैन होती. काही महिन्यातच त्याचे एका तजेलदार कांतीच्या व पीळदार स्नायूंच्या देखण्या तरुणात रूपांतर झाले.

जालंदरमधे दरवर्षी डिसेंबर महिन्यात 'हरवल्लभ संगीत परिषद' भरे. त्यासाठी सबंध भारतातून नामवंत गायक आणि वादक येत. गायन-वादन अगदी जवळून ऐकता यावे म्हणून भीमसेनने

तंबोऱ्यावर साथ करण्याची कामगिरी पत्करली. त्यावेळी पं. विनायकबुवा पटवर्धन हे ग्वाल्हेर घराण्याचे गायक उत्तर हिंदुस्थानातील श्रोत्यांना फार आवडत. एक देखणा मराठी मुलगा साथीला बसला आहे हे बघताच त्यांना त्याच्याविषयी कणव वाटला. "बेटा, तुला वाटलं तर मधून मधून मला थोडा आवाज लावून साथ कर", ते म्हणाले. बुवांचे गायन आक्रमक होते. भीमसेनने मधून मधून स्वर लावून व लहान लहान ताना घेऊन त्यांना उत्तम साथ दिली.

मैफल संपल्यावर बुवांनी त्याला "तू येथे काय करीत आहेस?" असे विचारले. भीमसेन म्हणाला, " मला पूर्ण वेळ देईल अशा कायम स्वरूपाच्या गुरूच्या मी शोधात आहे." "अरे", बुवा हंसत म्हणाले, "तुमच्या गदगजवळच पंधरावीस मैलावर कुंदगोळ गाव आहे. तेथे रामभाऊ सवाई गंधर्व हे फार मोठे गायक रहातात. ते तुला नक्की शिकवतील. माझेही मित्र आहेत ते." "सवाई गंधर्व! ते तर माझा आदर्श आहेत! विनायकबुवांचा सल्ला म्हणजे मी आता सवाई गंधर्वांचा शागीर्द होण्यास लायक झालो, असेच प्रशस्तीपत्रक नाही का?" भीमसेनचे विचारचक्र वेगात फिरू लागले. आता त्याला गदगला परतायची घाई झाली. त्याने वडिलांना कळवले, "मी परत येत आहे."

तीन वर्षांच्या भटकंतीनंतर भीमसेन परत आला. रमाबाई व गुरूराजांनी शेजाऱ्यापाजाऱ्यांना बोलावून आनंदोत्सव धुमधडाक्यात साजरा केला. रमाबाईंनी त्याला कोपऱ्यात गाठून डोळ्यात पाणी आणून म्हटले, "अरे भीमू, मी तुला तूप वाढले नाही म्हणून असं पळून का जायचं?" भीमसेनला काही कळेना. मग त्याला आठवले की ज्या दिवशी त्याने घर सोडले त्या दिवशी त्याने आणखी एक चमचा तूप मागितले होते; पण "फार तूप खाऊ नये" असे म्हणून आईने नकार दिला होता. त्याने मोठ्या मिन्नतवारीने 'तूप न मिळण्याचा' व 'आपल्या पलायनाचा' काही सबंध नव्हता हे आईला पटविले. पण मागाहून जेव्हा त्याला कळले की आपल्या आईने स्वतःला दोष देत तो परत येईपर्यंत एकभुक्त रहाण्याचे व्रत घेतले होते, तेव्हा त्याला फार वाईट वाटले. आईचाच त्याग तो!

आता गुरुराजांनी भीमूचा एकही शब्द खाली न पडू देण्याचा वसा घेतला होता. एक महिन्याच्या विश्रांतीनंतर ते सवाई गंधर्वांना ओळखणाऱ्या आपल्या भावाला व एका मित्राला घेऊन भीमसेनसह कुंदगोळला गेले. रामभाऊंनी भीमसेनला थोडे गायला सांगून शिकविण्याचे कबूल केले. मात्र फीची रक्कम गुरुराजांच्या पगाराच्या एक चतुर्थांश होती. "आतापर्यंत शिकलेले सर्व विसरावे लागेल, पहिल्यापासून सुरुवात करावी लागेल" हेही सांगितले. रहाण्या-जेवण्याची सोय शेजारच्या एका संगीत-रसिकाच्या घरात झाली.

सवाई गंधर्व रागसंगीत, नाट्यसंगीत, भजन वगैरे सर्व गायनप्रकारात तय्यार होते. पण स्वभावाने तापट. विद्यार्थ्याने बिनासवाल त्यांच्या आज्ञेचे पालन करावे असा त्यांचा दंडक होता. कुंदगोळ हे पाण्याच्या दुर्भिक्ष्याबद्दल प्रसिद्ध होते. घरात हरकाम्या म्हणून काम करण्याव्यतिरिक्त त्यांनी भीमसेनला दीड किलोमीटर अंतरावरील नदीवरून पाणी आणण्याची कामगिरी दिली. खेपा वाचविण्यासाठी तो बऱ्याच वेळा दोन्ही खांद्यांवर घागरी वाहून आणी. दुर्दैवाने रामभाऊंचे शिकविणेही नियमित नव्हते. सकाळ-संध्याकाळ ते भीमसेनला पूरिया राग शिकवीत.

एकदा आपल्या चिरंजीवाचे कसे चालले आहे हे पहाण्यासाठी गुरुराज कुंदगोळला गेले. भीमसेन दोन खांद्यांवर दोन घागरी पेलवीत घरी आला. गुरुराजांना काहीतरी संशय आला. त्यांनी भीमसेनच्या गालावर हात ठेवला, तर तो तापाने फणफणलेला होता. त्यांचा संताप अनावर झाला. त्यांनी गुरूजींना जाब विचारला. रामभाऊ क्षणभर शांत राहिले. मग म्हणाले, "मला जे योग्य वाटते तेच मी त्याला सांगतो. तुम्हाला हे पटत नसेल तर त्याला तुम्ही घेऊन जाऊ शकता." भीमसेनला ब्रह्मांड आठवले. त्याने वडिलांना गप्प रहाण्यास सांगितले व प्रकरण तेथेच मिटले.

विचार केल्यावर गुरूराजांना आपले चुकले हे कळले. शेवटी 'गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु' हेच खरे. कशावरून सवाई गंधर्व भीमूची परीक्षा घेत नसतील? त्यांचा हा विचार खरा ठरला. भीमसेनच्या गुरुभक्तीवर व दिवसभर संगीत वा घरकामात मग्न रहाण्याच्या अर्पित वृत्तीवर प्रसन्न होऊन सवाई गंधर्वांनी त्याला आपल्या घरी ठेवून घेतले.

सवाई गंधर्वांचे घर हा संगीताचा आश्रम होता. गुरूजी अहोरात्र संगीत साधनेत - संगीताचा विचार करण्यात वा रियाझ करण्यात - दंग असत. त्यांना पाहणे व त्यांचे राग, नाट्यसंगीत व भजने ऐकणे हेसुद्धा एक शिक्षणच होते. गुरुजी गंगूबाई हनगळांना शिकवीत, तेव्हा भीमसेन तिथे जाऊन बसे. सवाई गंधर्वांनी गायलेल्या 'नटमल्हार', 'तोडी', 'भैरवी' वगैरे रागांच्या ध्वनिमुद्रिका 'हिज् मास्टर्स व्हॉईस (HMV) या कंपनीने काढल्या होत्या व त्यांना अमाप लोकप्रियता लाभली होती. भीमसेन त्यांची पारायणे करून गुरूजींच्या शैलीत गाण्याचा प्रयत्न करी.

दुर्दैवाने सवाई गंधर्वांना आधीपासून जडलेला रक्तदाबाचा विकार बळावला व त्यांनी भीमसेनची शिकवणी बंद करून त्याला गदगला परत पाठविले. गुरुजींची प्रकृती खरोखरी इतकी खालावली आहे की ते काही कारणाने आपल्यावर रुष्ट झाले आहेत हे भीमसेनला कळेना. गुरूजींच्या स्फूर्तीदायक सहवासाला व त्यांच्यासारखे गायक व्हायच्या आपल्या स्वप्नाला आपण मुकलो हेच सत्य फक्त त्याला माहीत होते. ◆◆

संदर्भ :
१) शंकर अभ्यंकर : 'स्वरभास्कर भीमसेन जोशी' आदित्य प्रकाशन २००२ (पृ. ३१५)
२) ७५वा वाढदिवस समारंभसमिती : 'स्वराधिराज' १९९६ (पृ. १४१)
३) अनिल पुंडलिक देशपांडे (संपादक) : 'स्वर यज्ञ अमृतमहोत्सव समिति', २००२ (पृ. १८२)
४) वसंत पोतदार : 'भीमसेन', राजहंस प्रकाशन २००२ (पृ. २५४)
५) Manohar Nadkarni: 'Bhimsen, Man and Music', 1983
६) बहुमोल तोंडी माहिती : माझे सासरे श्री. आप्पासाहेब पारुंडेकर व माझी पत्नी मंगला यांजकडून.
७) भीमसेनजी व वत्सलावहिनी यांच्याबरोबर झालेली माझी अनेक संभाषणे.

◆◆◆

**एकताचे लेखक, वाचक, जाहिरातदार व हितचिंतक या सर्वांना २००७ साठी शुभेच्छा !**

# भारताचा विसाव्या शतकातील तानसेन – पंडित भीमसेन जोशी

(८५ व्या वाढदिवसानिमित्त गौरवांजली ) रमेश वाघमारे, ऑटवा, ON (उत्तरार्ध)



सवाई गंधर्वांनी शिकवणी बंद केली व भीमसेनला गदगला परत पाठविले. निराश होणे त्याच्या स्वभावात नव्हते. गुरूराजांनीही त्याला तबला-पेटीच्या साथीसह गाता यावे म्हणून दोन वादक नेमले. ह्या त्रिकूटाचे इतके छान जमले, की तासन् तास ते आपण मैफल करीत आहोत अशा मिजासात रियाझ करीत. तो ऐकून रसिकजनांनी त्यांना खासगी बैठकींसाठी आमंत्रणे देणे सुरू केले. मैफल रंगवणारच अशा आत्मविश्वासाने भीमसेन घरातून निघे व यजमानांचे समाधान होईपर्यंत गात राही. गुरुराजांनाही आपला मुलगा मिळकतीत भर घालतो ह्याचा अभिमान वाटला.

त्याच सुमारास भीमसेनच्या आयुष्यात एक चमत्कार घडला. पंधराव्या शतकात अवतार घेतलेले देवर्षी राघवेंद्रस्वामी हे जोशी घराण्याचे आराध्यदैवत. त्यांची समाधी तुंगभद्रेच्या काठी मंत्रालय ह्या गावी आहे. भीमसेनने आपली सेवा त्यांच्या चरणी रुजू करावी अशी आज्ञा गुरुराजांनी केली. त्याप्रमाणे तो साथिदारांसह तेथे गेला. सकाळी तो तबला-पेटीच्या साथीत साग्रसंगीत भजन-प्रभात करी, पण संध्याकाळी एकटाच तुंगभद्रेच्या काठी शांत वातावरणात आलापी करीत समाधी लावी. एक काळे कुत्रे येऊन त्याचे गाणे निमूटपणे ऐकत बसे. मंदिरातील पुजाऱ्यांना विचारता त्यांनी आपण असे श्वान कधीही न पाहिल्याचा निर्वाळा दिला. भीमसेन तो प्राणी राघवेंद्रस्वामींचाच अवतार व त्याची हजेरी त्यांचा कृपाप्रसाद समजला. आश्चर्य म्हणजे त्या दिवसापासून भीमसेनचा गळा एकदम खुलला व पूर्वी जे संगीतालंकार कंठातून काढण्यास त्याला प्रयास पडत ते सहजपणे निघू लागले.

भीमसेनचे कार्यक्रम चालूच होते. एकदा तर त्याचे बाहेरील गावात एकामागून एक इतके लागले होते, की तो तीन महिन्यांनी घरी परत आला. घरी एक अत्यंत आनंदाची बातमी त्याची वाट पहात होती. स्वामीकृपा फळा आली! रामभाऊ सवाईगंधर्वांनी त्याला शिकवणीसाठी खास पाचारण केले होते!

गुरुजींच्या निरोपास दोन कारणे होती. एक म्हणजे रामभाऊंचा रक्तदाब आटोक्यात आला होता. त्याहीपेक्षा भीमसेनची तयारी व तडफ आठवून त्यांना आपल्या पश्चात तोच आपली परंपरा व कीर्ती टिकवून धरील, नव्हे वृद्धिंगत करील, हे कळून चुकले होते. पण थांबा! मानाचे बोलावणे आले म्हणून काही एक मैलावरून पाणी आणण्याच्या कामात त्याला अजिबात सूट मिळाली नाही बरं का!

रामभाऊ कसे शिकवित? आपल्या शास्त्रीय संगीतात प्रत्येक रागाची वेळ ठरलेली आहे. उदाहरणार्थ, राग भैरव सकाळी, यमन संध्याकाळी व मालकंस रात्रीच गाता येतो. कोणता राग केव्हा गायचा या संकेतानुसार वेळ आणि ५०-६० राग यांचे वर्गीकरण दाखवणारी एक सोपी व सुंदर वर्तुळाकृति **itcsra.org** ह्या वेबसाइटवर आढळेल. सवाई गंधर्वांची अशी धारणा होती की प्रत्येक समयाचा एकेक राग पक्का झाला, की त्या समयाचे इतर राग कमी प्रयासात गळ्यात बसतील. त्यांनी भीमसेनला सकाळी मियाँकी तोडी, दुपारी मुलतानी व संध्याकाळी शुद्धकल्याण व पूरिया हे चार राग शिकविण्यास - नव्हे त्याच्याकडून घोटवून घेण्यास - सुरुवात केली. १९३८-४० ह्या तीन वर्षात हे चारच राग तो गुरुगृही शिकला. सवाई गंधर्वांनी त्याला त्याच्या आवाजाच्या धर्माप्रमाणे रियाझ कसा करावा हेही शिकविले.

कुंदगोळमधील शिक्षण संपले. भीमसेन मोकळ्या जगात आला. त्याला आता लखनौला जावेसे वाटले, कारण त्या सरंजामी शहरात अनेक गायक-वादकांचे वास्तव्य होते. इतकेच नव्हे तर गल्लोगल्ली लहानमोठे जलसे चालत. वयाच्या मानाने गायनाची आश्चर्यजनक तयारी, निगर्वी स्वभाव व स्वच्छंदी वृत्ती ह्या गुणांमुळे त्याला अनेक हितचिंतक व मित्र मिळाले. त्यात शहनाईनवाझ बिस्मिल्लाखान, व्हायोलिनपटू व्ही. जी. जोग, गझलसम्राज्ञी बेगम अख्तर, व टप्पा-ठुमरींची मलिका रसूलनबाई ही सुस्वभावी कलाकार मंडळी होती. बिस्मिल्ला व भीमसेन रेडिओकेंद्रासमोर, अधिकाऱ्यांना दिसेल अशा तऱ्हेने, जोर-बैठका काढीत! उद्देश हा, की त्यांची ओळख व्हावी. भीमसेनची शिकण्याची हौस मात्र अजून फिटली नव्हती. एकदा त्याला मुश्ताक हुसेन हा अवलिया गवई भेटला. राग नटमल्हार हा त्याचा हातखंडा. (आता तो त्यांचा झाला आहे). मग काय, त्याच्याकडे सहा महिने हरकाम्या म्हणून राहून भीमसेनने तो राग आत्मसात करून घेतला.

वर उल्लेख केलेल्या कलावंतांना व इतर हितचिंतकांना भीमसेनच्या गायनातील अद्वितीयत्व एव्हाना पटले होते. त्यांनी त्याचे नांव पसरविण्यास सुरुवात केली. त्याला मुंबई, हैदराबाद, लखनौ वगैरे केंद्रांवरून गाण्याची संधी मिळाली. पैसे मात्र बेताचेच मिळत. त्यात कसेतरी भागे.

पण भीमसेनच्या भावी यशाचे बीज रोविले गेले ते १९ जानेवारी १९४६ ह्या दिवशी पुण्याला एका सायंकालीन मैफलीत. त्या दिवशी सवाई गंधर्वांच्या चाहत्यांनी त्यांच्या षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्त एक संगीत समारोह आयोजित केला होता. नुसते पुण्या-मुंबईचेच नव्हेत,

तर बडोदे, नागपूर, मंगळूर अशा दूरदूरच्या शहरांतून त्यांचे भक्त आले होते. पक्षघाताने आजारी असलेल्या सवाई गंधर्वांना स्वयंसेवकांनी खुर्चीत उचलून मानाने पुढे बसविले होते. मैफलींचे अनेक फड जिंकलेल्या व मी मी म्हणणाऱ्या गवयांचा नक्षा उतरविणाऱ्या त्या सूरसम्राटाला मुजरा म्हणून अनेक नामवंत गायक-वादक सजविलेल्या मंचकावर आपली कला दाखवीत होते.

भीमसेनचा क्रम आला. त्याला फक्त पंचवीस मिनिटे देण्यात आली होती. त्याचा आत्मविश्वास तर असा, की 'मी बुजुर्ग गायक आहे व इतर गाऊन गेलेले नवशिके!' त्याने मियाँकी मल्हार ह्या पावसाळी रागाची बरसात सुरू केली. त्या सुरांच्या शिडकाव्याने आळसावलेले वातावरण उल्हसित झाले. जुने जाणकार श्रोते "ह्या तरुण वयात हा आपल्या रामभाऊंची आठवण करून देतो. कमाल आहे", असे कुजबुजू लागले. नंतर त्याने 'चंद्रिका ही जणू' हे नाट्यगीत म्हटले. वेळ संपली. शेकडो श्रोते मंचकाकडे धावले व त्यांनी त्याचे अभिनंदन केले. काही संयोजकांनी तर - त्यात बाहेर-गावचे पण होते - त्याला तेथल्या तेथे मैफलीच्या सुपाऱ्या दिल्या.

भीमसेनजींच्या सांगीतिक कारकीर्दीत १९४६ ते ५५ ही वर्षे बस्तान बसविण्यात गेली. त्यातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९५३ साली त्यांना पहिल्यांदा कलकत्त्याचे निमंत्रण आले. भीमसेन अगदी जमून गायला. भावनाप्रधान बंगाली रसिकांनी त्याच्यावर स्तुतीचा वर्षाव केला. त्यानंतर त्यांना प्रतिवर्षी अनेकदा आमंत्रण येई. कलकत्त्याच्या श्रोत्यांनी कुणाहि दुसऱ्या कलाकारावर एवढे प्रेम केले नाही.

येथे भीमसेनजींच्या कौटुंबिक जीवनाबद्दल थोडक्यात सांगितले तर ते अप्रस्तुत न व्हावे. त्यांनी दोन विवाह केले. एक रूढी व परंपरा ह्यांच्या नियमाने व दुसरा मदनाने त्यांना आपले लक्ष्य केले म्हणून. १९४१ साली औरंगाबादला त्याची मैफल संपल्यावर जे श्रोते अभिनंदन करायला आले त्यात एक मुधोळकर कुटुंबही होते. त्यांची तेरा वर्षाची कन्या वत्सला हिच्याकडे त्याची दृष्टी जाताच तो स्वतःला हरवला. तांबूस गोरा वर्ण, लांबसडक केस, मादक डोळे व सुंदर चेहरा. ती नुसतीच सुंदर नव्हती, तर शास्त्रीय संगीत शिकत होती व तिला गायिका व्हायचे होते. प्रथमदर्शनीच दोघांनी एकमेकांना वरले असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

इकडे गायकाच्या आईसाहेबांनी - रमाबाईंनी - आपल्या मुलाचे लग्न करायचे ठरविले व आपली देखणी व सुशील भाची सुनंदा कट्टी हिची वधू म्हणून निवड केली. भीमसेन पेचात पडला. शेवटी "आपण आजपर्यंत आईला त्रासच देत आलो आहोत, आता एवढे तरी तिच्या मनासारखे होऊ दे" असा विचार करून तो लग्नास तयार झाला.

लग्न झाले; पण भीमसेन-वत्सला ह्यांचे प्रेम मंदावण्याऐवजी जास्त उत्कट होत गेले. जमेल तेव्हा ती दोघं एकमेकांना भेटत. पुढे 'भाग्यश्री' व 'परिवर्तन' ह्या नाटकातून त्यांनी नायक-नायिकेची कामेही केली. अशी दहा वर्षं गेली. शेवटी आता थांबणे शक्य नाही असा निर्णय त्यांनी घेतला. द्विभार्याप्रतिबंधक कायदा नसलेल्या मध्यप्रदेशात - नागपूरला - ती दोघं १९५१ साली विवाहबद्ध झाली. तेव्हापासून लौकिकदृष्ट्या भीमसेन-वत्सला हेच दांपत्य जनमानसात रुजले. विशेष म्हणजे गुरुराजांनाही भीमसेनच्या भवितव्यासाठी हे लग्न हवे होते.

भीमसेनजींनी दोन्ही संसार नेटके केले. दोन्ही घरची मुलं-मुली कर्तृत्ववान निघाली हे मला माहीत आहे. सुनंदाताई स्वतंत्र राहू लागल्या तरी त्यांनी आपल्या पतीविरुद्ध कधीही शब्द उच्चारला नाही. कुणी सहानुभूति दाखविली तर "मला गायनात कळत नाही. ह्यांना उत्तेजन व स्फूर्ति देण्याचे महत्त्वाचे काम वत्सला करीत आहे" असेच त्या म्हणत.

भीमसेनजींच्या वैभवात व कीर्तीत वत्सलावहिनींचा भाग किती? ह्याचे उत्तर भीमसेनजींनीच भारती वर्मा ह्यांना दूरदर्शनवर दिलेल्या मुलाखतीत दिले आहे. "मी आज जो काही आहे त्यात तिचा फार मोठा वाटा आहे. तिने शब्बूखान ह्या जाणकार उस्तादाकडून गायनाची तालीम घेतली होती व ती एक चांगली गायिका होऊ शकली असती. पण संसारासाठी तिने हे स्वप्न बाजूला ठेवले." १९७०-८० ह्या दशकात काही वर्षे भीमसेनजी मदिरेच्या पूर्ण आहारी गेले होते. तेव्हा मोठ्या धीराने, प्रसंगी मानहानी सहन करून वहिनींनी त्यांना त्या गर्तेतून वर काढले. भीमसेनजींच्या घरात आल्या-गेल्याचे जे दिलखुलास स्वागत होई, त्यात वहिनींच्या अगत्यशील स्वभावाचा फार मोठा हिस्सा होता हे मी स्वानुभवाने सांगतो. त्यांची सून लक्ष्मी व कन्या शुभदा ह्यांचीही बहुमोल साथ मिळे.

वत्सलाताईंशी लग्न झाले तेव्हा भीमसेनजी पुण्यास स्थायिक झाले होते. पहिली पाच-सहा वर्षे ह्या दांपत्याचे ओढगस्तीतच गेली. १९५६ पासून नियमित चौफेर कार्यक्रम मिळू लागले. तरी बिदागी बेताचीच मिळे. आर्थिक स्थैर्य हळूहळू मिळत होते, पण लक्ष्मीचा अविरत ओघ सुरू झाला तो १९६० पासून. मोठमोठ्या बिदाग्या मिळू लागल्या तरी मानधनासाठी त्यांनी कुणाला कधी अडवून धरले नाही. मी त्यांना पहिल्यांदा १९५६ साली ऐकले व त्यानंतर अनेकदा.

पैसा मिळू लागल्यावर भीमसेनजींनी मोठी गाडी घेतली. आता परिचित असलेले त्यांचे विक्रमी ड्रायव्हिंग तेव्हाच सुरू झाले. सकाळपासून दुपारपर्यंत मोटार हाकून कार्यक्रमाच्या स्थळी पोहोचणे; तेथे स्नान करून मैफल करणे; मग तीन चार तास झोप घेऊन दुसऱ्या गावात सकाळपर्यंत मैफलीसाठी पोहोचणे; तेथून मग संध्याकाळच्या कार्यक्रमाला पुढच्या गावी! तेथे मात्र जरा आरामाने घ्यायचे. तरीसुध्दा पहाट झाली रे झाली, की ह्यांची मोटार पुण्याच्या रस्त्यावर धावू लागे. दिल्ली, आग्रा, बनारस, जबलपूर वगैरे दूरच्या शहरातसुध्दा इतके वारंवार कार्यक्रम होत, की विमानातील कर्मचारीच नव्हे तर पायलटसुध्दा त्यांना ओळखू लागले. पु. ल. देशपांड्यांनी म्हटल्याप्रमाणे "भीमसेनजींचे गुरु सवाईगंधर्व तर भीमसेन स्वतः हवाई गंधर्व !"

१९६० ते १९९८ पर्यंत - त्यांच्या प्रकृतीचे नष्टचर्य सुरू होईपर्यंत - ते कलाकारांचे अनभिषिक्त राजे होते. मी त्यांच्याबद्दल भारतातील सर्व प्रसिद्ध कलाकारांशी बोललो आहे. सर्वांचे एकच मत, "हा विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ गायक आहे." ह्याच वर्षी पद्मभूषण मिळालेले नामवंत गायक राजन मिश्रा आमच्या ऑटवात मालकंस बेहतरीन गाइले. मी त्यांना "तुम्ही अगदी भीमसेनजींसारखे गायलात" असे म्हटले तर म्हणाले, "रमेशभाई, माझी कुणाशीही तुलना करा, त्यांच्याशी नाही. ते तर माझं दैवत आहे." एकदा सितारनवाझ

विलायत खाँ गप्पा मारताना गायकांचे नांव घेऊन त्यांच्याबद्दल उपरोधाने बोलत. मी मधेच भीमसेनजींबद्दल विचारले, तर प्रफुल्लित चेहऱ्याने म्हणाले, "वह तो जीनियस (genius) है।" त्यांचे यथार्थ मूल्यमापन केले आहे पं. जसराजजींनी. "तानसेननंतर संगीताच्या साम्राज्यात आपला एकछत्री अंमल प्रस्थापित करणारा एकमेव कलाकार म्हणजे भीमसेन."

भीमसेनजींना ही जी अमाप लोकप्रियता मिळाली त्याचे कारण काय? ह्याचे कारण त्यांच्यात काही अद्वितिय गुण एकत्र आले आहेत. पहिला गुण म्हणजे त्यांचा आवाज. तो अस्सल 'भीमसेनी' आहे. त्यात माधुर्य व खजति (म्हणजे सगळ्यात खालच्या सप्तकात) वाजविलेल्या सतारीचा 'बाज' आहे. वीर, भक्ती, करुणा वगैरे रस सहजगत्या व्यक्त करण्यास लागणारा लवचिकपणाही त्यात आहे. दुसरा गुण म्हणजे त्यांची मनाला धुंद करणारी आलापी. ती सुरू झाली की मन शांत होते. शास्त्रीय संगीतात आलापीत गायकाची खरी कल्पकता दिसते. तिसरा गुण म्हणजे त्यांची अजोड तानबाजी. ह्या ताना वरवरच्या 'जबड्या' नसतात तर बंदिशीतील भावांचे फवारे उडवीत ह्रदयातून सरसरून बाहेर पडतात. चौथे वैशिष्ट्य म्हणजे श्रोत्यांची पातळी कशीही असो, त्या पातळीवर जाऊन ते त्यांचे मनोरंजन करतील. ह्याची दोन उदाहरणे देतो -

एका गावात श्रोत्यांत 'समदी पावनं' मंडळी होती. भीमसेनजींनी राग सुरू करताच एकेक उठून जाऊ लागला. राग आवरता घेऊन त्यांनी भजन सुरू केले. बातमी पसरली. हळूहळू सर्व मंडळी परत आली. इतकेच नव्हे, तर आपल्या मित्रांनाही बरोबर घेऊन आली. दुसरा किस्सा कलकत्त्याचा. हजारो लोकांना त्यांचे गायन ऐकायचे होते. मग करता काय? संयोजकांनी गंगेच्या पात्रातच स्टेज बांधले. आजूबाजूला हजारो लोक किनाऱ्यावर बसून त्यांचे गायन तल्लीनतेने ऐकत होते. एकदम पाऊस पडू लागला. पण लोकही उठले नाहीत व भीमसेनजींनाही त्यांनी उठू दिले नाही.

पण वर सांगितलेले चारही गुण मैफलीत श्रोत्यांसमोर प्रभावीपणे सादर करण्यासाठी आणखी एक खास गुण लागतो. तो म्हणजे आत्मविश्वास. मान्यवर कलावंतही त्यांच्या ह्या गुणास तोड नाही हे कबूल करतात. संगीत समारोहात कुणी कितीही चांगला गावो वा वाजवो, भीमसेनजी आपल्या गायनाने त्याने भरलेला रंग पुसून टाकणार. ह्याचे काही किस्से सांगतो -

उस्ताद अमीर खाँ ह्या गवयाबद्दल भीमसेनजींना नितांत आदर. त्यांची आलापी व त्यांच्या ताना भीमसेनजींनी आवश्यक ते बदल करून आपल्या गायनात समाविष्ट केल्या आहेत. त्यांच्या काही बंदिशीही पंडितजी आवडीने गातात. पण हेच अमीर खाँ भीमसेनजींच्या मैफल मारण्याच्या कसबाला इतके मानतात की संगीत समारोहात वयाने ज्येष्ठ असलेल्या गायकाने लहानाच्यानंतर गायचे असते हा संकेत झुगारून भीमसेनजींच्या आधीच गाऊन घेत. कां? "अरे भीमसेनके बाद हमको कौन सुनेगा?" पण एकदा खाँसाहेबांचे गाणे अपेक्षेबाहेर रंगले. इतके, की श्रोत्यांना "आज तरी अमीरखाँ सरस ठरणार" असे वाटले. पण नंतर आलेल्या भीमसेनजींचा पहिलाच 'सा' असा काही घुमला की समोर बसलेल्या खाँसाहेबांनी एकदम "वाह!" अशी दाद दिली. हळूहळू तो हॉल भीमसेनमय झाला. नंतर कुणीतरी खाँसाहेबांजवळ भीमसेनच्या मैफलीचे रसग्रहण करू लागला तर ते म्हणाले, "अरे मैफलीचं जाऊ द्या. पहिल्या 'सा'तच त्यांनी मला खाऊन टाकलं."

कलकत्त्याच्या एका संगीतोत्सवात सितार-सम्राट पं. रविशंकर व भीमसेनजी ह्या दिग्गजांची जी खेळकर लढत झाली तिची कथाही अशीच रोमहर्षक आहे. रविजींच्या चाहत्यांनी त्यांना "प्रत्येक समारोहात समीक्षक व सामान्य श्रोतेही भीमसेनांचीच जास्त वाहवा करतात" असे चिथावले. "असं म्हणता? मग आज बघा" ते उत्तरले. मंचकावर जाण्याआधी ते भीमसेनांच्या खोलीत गेले. स्वराधिराज आपल्या चहात्यांच्या टोळक्यात बसले होते. "भीमसेन," रविजी म्हणाले, "आज मी तुमची जिरवितो." भीमसेन हसले. "रविजी" ते उद्गारले, "आधी तुमचं तुणतुणं का काय ते वाजवा आणि परत या. मग आपण बघू." खरोखर त्या दिवशी रविजींनी रसिकांना एका वेगळ्या जगात नेले. ही बातमी भीमसेनजींना कळली.

ते मंचकावर आले. समोर बसलेल्या रविजींना त्यांनी पाहिले न पाहिल्यासारखे करून तंबोरे लावले व नेहमीच्या आक्रमक पवित्र्यात तोडी रागाच्या एका प्रकाराची आलापी सुरू केली. हळूहळू त्या तोडीचा आर्त स्वर रविजींच्या अंतःकरणात जाऊन इतका मिळाला की त्यांच्या डोळ्यांतून टप्टप अश्रू पडू लागले. ते पुसावे असेही त्यांना वाटेना. ती सबंध मैफल त्यांनी समाधी लागल्यासारखी ऐकली. मैफल संपल्यावर त्यांनी भीमसेनजींचे "वाः वाः वाः! कमाल किया" असे कौतुक केले.

१९७२पर्यंत भीमसेनजींचे नांव काश्मीरपासून कन्याकुमारी-पर्यंत सर्व शहरात माहीत झाले होते. ज्यांना शास्त्रीय संगीतात अजिबात गंध नव्हता असे लोकही त्यांच्या मैफलीस आवर्जून जात. किंबहुना तांत्रिक ज्ञान असणारे थोडेच. बहुसंख्य श्रोते "तुमचे ते रागबिग आम्हाला समजत नाही, पण तुमचं गाणं ऐकून आमच्या मनाला शांत वाटतं व आनंद होतो," असेच म्हणणारे होते. तरीसुद्धा खेड्यापाड्यातील भाविक लोक व शहरातील फक्त भजन ऐकणारी मंडळी त्यांच्या गाण्याच्या कक्षेबाहेर राहिली होती. अशा लोकांसाठी भीमसेनजींनी अडीच-तीन तासांचा फक्त भक्तिगीतांचा एक कार्यक्रम करण्याचे ठरवले. त्यातील भजनांची निवड करण्यासाठी व त्यांना योग्य चाली देण्यासाठी त्यांच्यासमोर एकच नांव उभे राहिले. ते म्हणजे रामभाऊ फाटक यांचे.

फाटक हे संतवाङ्मयाचे अभ्यासक व प्रतिभाशाली संगीत-दिग्दर्शक होते. एव्हाना त्यांनी भीमसेनजींच्या लोकप्रिय झालेल्या भजनांना चाली दिल्याच होत्या. त्यात भर घालून त्यांनी कार्यक्रम तयार केला. हा प्रयोग यशस्वी होईल का ह्याबद्दल भीमसेन शेवटपर्यंत साशंक होते, पण वत्सलाताईंनी त्यांना प्रोत्साहन दिले. संतवाणीचा पहिला प्रयोग शनिवार दिनांक ५ जुलै १९७२ रोजी आषाढी एकादशीला पुण्यात झाला. टाळ, चिपळ्या, मृदंग, झांज वगैरे वाद्ये व सहगायक साथीला होते. 'जय जय राम कृष्ण हारी' ने सुरुवात करून त्यांनी 'अणुरणीया थोकडा', 'नामाचा गजर' अशी एकामागून एक सरस भजने म्हटली. सर्व तिकिटे खपून गेली होती, इतकेच नव्हे तर कार्यक्रम संपल्यावर अनेक संगीतसंस्थांनी कार्यक्रमाची मागणी केली. हळूहळू संतवाणीचा गजर षण्मुखानंद हॉलपासून चंद्रभागेच्या वाळवंटापर्यंत व लहान खेड्यापासून मध्यपूर्वेतील देशांपर्यंत ऐकू आला.

आता भीमसेनजींवर जे दोन आरोप केले जातात त्यांचा मी उल्लेख करतो. पहिला आरोप असा की 'स्वरभास्कर' तेच तेच राग गातात. आता तेच तेच म्हटलं तरी पंचवीस-तीस रागांवर त्यांचा हातखंडा आहे. मी सर्व कलाकारांना ऐकले आहे. कुणाच्याही पोतडीत ह्यापेक्षा जास्त राग नाहीत. उलट भीमसेनजींची खासियत अशी की जयपूर, पतियाळा वगैरे संगीत घराण्यांची त्यांना भावलेली वैशिष्ट्ये त्यांनी आपल्या गायकीत कौशल्याने सामावली व ती जास्त आकर्षक केली. हाच अर्थ त्यांच्या "चांगला गायक हा चांगला चोर असायला पाहिजे" ह्या प्रसिद्ध उक्तीत अभिप्रेत आहे. म्हणूनच एकच राग ते निरनिराळ्या ढंगात सादर करू शकतात. मी स्वतः हे मॉंट्रियल व टोरांटो येथे यमनकल्याण राग त्यांनी दोनदा म्हटला तेव्हा अनुभवले आहे.

भीमसेनजींवर दुसरा आरोप असा की गाताना त्यांचे हातवारे व चेहऱ्यावरचे हावभाव पराकोटीचे होतात. हा आरोप फार थोडे लोक करतात. त्यांचे चाहते तर त्यांचे गाणे ऐकण्यात इतके तल्लीन होतात की त्यांच्या ते लक्षातही येत नाही. ह्या विषयावर श्रेष्ठ कथक नर्तक श्री. बिरजू महाराज ह्यांच्या एका नर्तक विद्यार्थिनीने काढलेले उद्‌गार मला समर्पक वाटतात. ऑटवात त्यांचा कार्यक्रम झाल्यावर ती मला स्वयंस्फूर्त म्हणाली. "मी जर त्यांच्या गाण्यावर नृत्य केले तर ते करतात अगदी तसेच हावभाव व हातांची हालचाल करीन! ते नुसतं गात नाहीत, तर गाणं साकार करतात."

व्यक्ती म्हणून भीमसेनजी कसे आहेत? एका शब्दात सांगायचे म्हणजे जिंदादिल! म्हणजे अजातशत्रु, मनाने सरळ, धाडसी, मितभाषी पण प्रसंग आला तर हजरजबाबी. त्यांच्या विरुद्ध अजून मी भारताच्या कुठल्याही ज्येष्ठ किंवा तरुण कलाकाराकडून विसंवादी सूर ऐकला नाही. त्यांच्या धाडसाबद्दलच्या सत्यकथा इतक्या विलक्षण आहेत की त्या दंतकथा वाटाव्यात. स्वतःच्या मोटारीने दूरदूरचे पल्ले गाठायची हौस! एकदा दिल्ली ते मद्रास प्रवास करताना जबलपूरजवळ शॉर्टकट घेतला, पण त्यांची गाडी चुकून वाघांच्या अभयारण्यात शिरली. समोर वाघाची दोन पिल्ले खेळत होती व थोड्या अंतरावरून किलकिल्या डोळ्यांनी शार्दूलराव बघत होते. दोन वादक खिडक्या लावून खाली मान घालून बसले. पण भीमसेनजी? ते सरळ खाली उतरले व पिल्लांना जवळ घेऊन खेळवू लागले. वाघ तसाच गुपचूप बसून राहिला. तसेच नाशकाला हत्तीजवळ गेले असता गजराजाने त्यांच्या खांद्यावर सोंड ठेवली. सगळे ओरडले, पण भीमसेनजींनी त्याच्या सोंडेवरून हात फिरवायला सुरुवात केली.

पण हे झाले नैमित्तिक प्रसंग. त्यांचा खरा निर्भीडपणा दिसतो तो हिंसक कुत्रे हाताळताना. त्यांचे एक तबलावादक म्हणाले, "एका ठिकाणी एका यजमानाने दोन शिकारी कुत्रे बांधून ठेवले होते व 'त्यांच्याजवळ जाऊ नका' अशी पाटीही लावली होती. काय होते आहे हे समजण्याच्या आत पंडितजी त्या कुत्र्यांजवळ गेले व त्यांनी त्यांना गोंजारत त्यांच्या जबड्यात हात घातला. एखाद्या पपीप्रमाणे ती कुत्री शेपटी हलवू लागली." ह्याबाबत पंडितजींचा खुलासा : "तुम्ही न घाबरता कुत्र्याशी खेळलात तर त्याला तुमच्याबद्दल विश्वास वाटतो."

भीमसेनजींच्या हजरजबाबीपणाचे दोन किस्से त्यांच्या गुरूभगिनी गंगुबाई हनगळ ह्यांनी मला सांगितले. एकदा हुबळीला अगदी गंगुबाईंच्या घरासमोर एका चाहत्याकडे भीमसेनजींचे गायन होते. त्याचवेळी गंगुबाईंच्या सुनेच्या प्रसूतीची वेळ येऊन ठेपली होती. सुनेची काळजी घेताना त्या मधूनमधून गॅलरीत जाऊन गायन ऐकून येत. कार्यक्रम संपला व भीमसेनजी बाहेर आले. "काय अक्का, सुनेचा रिझल्ट लागला का?" त्यांनी विचारले. "नाही हो अजून" गंगुबाईंनी उत्तर दिले. "चालायचंच" खालून भीमसेनजी उत्तरले. "आपलं किराणा घराणं ना? विलंबित आलापी जरा जास्तच चालते."

दुसरा किस्सा भीमसेन मदिरेच्या पूर्ण आहारी गेले होते तेव्हाचा आहे. हुबळीला त्यांचे गायन होते; पण या वेळी पंडितजींना इतकी जास्त झाली होती की त्यांना गाताच येईना. गंगुबाईंच्या बहिणीला इतके वाईट वाटले की ती रडू लागली. स्टेजवर जाऊन ती त्यांना म्हणाली, "अण्णा, तुम्ही असं कां हो करता?" भीमसेनजींनी तिच्याकडे पाहिले व समजावणीच्या सुरात म्हटले, "अग तू कां रडतेस? माझं ब्रॅडमनसारखं आहे. नेहमी सेंचुरी काढतो पण कधीकधी झीरोमधे आऊट होतो!"

मी भारतात गेलो की आप्पासाहेबांबरोबर भीमसेनजींकडे जाणे होई. ते सर्व कुटुंबच अगदी साधे व आतिथ्यशील आहे. वत्सलावहिनी 'या जावईबापू' असे स्वागत करीत. मग चहा, फराळ किंवा जेवणाचा आग्रह. मंगलला वत्सलामावशींनी नेहमीच माहेर-वाशिणीप्रमाणे वागविले. प्रत्येक वेळी शकुनाची लहानमोठी भेट मिळे. भीमसेनकाका उठून त्यांच्या गायनाची एखादी जुनी दुर्मिळ टेप आणून "ही तुला कुठेही बाजारात मिळणार नाही" असे म्हणून भेट देत.

पण बव्हंशी भीमसेनजी आपल्याच तंद्रीत शांत बसलेले असत. कुणी काही विचारले तरच उत्तर देत. त्यांच्या चेहऱ्यावर समाधिस्त योग्याचे तेज भासमान होई. मी काही सेकंद डोळे मिटून तो आभास आत्मसात करण्याचा प्रयत्न करी. वहिनींचे आतिथ्य चालू असे. संक्रांत असली तर भीमसेनजींच्या हातात मला देण्यासाठी तिळगूळ देऊन जात. पण उन्मनी अवस्थेतील गुरूजी तो तसाच मुठीत धरून ठेवत. वहिनी मग "अहो नुसतं धरून काय बसलात? वाघमाऱ्यांना द्या" असं फर्मावीत. "अरे हो" असे उत्तर देऊन ते मला ताबडतोब देत.

एकदा मी दोन पिशव्या पुस्तके खरेदी करून त्यांच्याकडे गेलो. माझी पुस्तकांची आवड पाहून वहिनींनी आतल्या खोलीतून नवी कोरी पुस्तके भरलेली दोन खोकी आणविली. त्यातील सर्व पुस्तके भीमसेनजींना महाराष्ट्रातील नामवंत लेखक-लेखिकांनी भेट दिलेली होती. "घेऊन जा तुम्हाला पाहिजे ती," त्या म्हणाल्या. "नको, नको," मी उत्तर दिले, "ठेवा तुमच्यासाठी व भीमसेनजींसाठी वाचा-यला." "आमचे हे?" उपरोधिक स्वरात हंसत त्यांनी उत्तर दिले. "आमचे 'हे' फक्त चांदोबा वाचतात." जवळच खुर्चीवर बसलेल्या भीमसेनजींनी खुषीत उत्तर दिले, "आपल्याला चांदोबा आवडतो."

१९६० ते १९९८ हा काल भीमसेनजींनी गाजवला. त्यानंतर त्यांचे नष्टचर्य सुरू झाले. १९९८ साली घरी जिना उतरताना त्यांची एक पायरी चुकली व अपघातात त्यांच्या पायाचे हाड मोडले. हळूहळू स्मृतिभ्रंश होऊ लागला. त्याचे निदान म्हणून मेंदूत दोन गाठी सापडल्या. त्यावर शस्त्रक्रिया झाल्यावर त्यांची स्मृती सुदैवाने पूर्ववत् परत आली. पण केवळ भारतातच नव्हे तर २३ देशांत - त्यात युरोप,

पान ४५ वर

# मी आणि उंदीर





सुधा खडकीकर यांचा बोली भाषेत लिहिलेला 'उंदीर आणि मी' ('एकता', जानेवारी, २००७) हा हलकाफुलका लेख भावला. सुरुवातीपासून शेवटपर्यंत लेखात सहजता असून शब्दचित्रनिर्मिती साधली आहे. पदोपदी मजेदार रीतीनं वर्णन असल्याने लेख पुन्हापुन्हा वाचावासा वाटतो.

हा लेख वाचतांवाचतां घरी पाहिलेल्या गणेशवाहनांच्या कौशल्याची मला आठवण झाली. घरामागच्या अंगणात पिवळे 'फिंच' पक्षी यावेत म्हणून सूर्यफुलाच्या बियांची थैली विकत आणली, उघडली आणि स्वयंपाकघराच्या कट्ट्यावर ठेवली. दुसऱ्या दिवशी सकाळी पाहतो तो बऱ्याच बियांचा चट्टामट्टा झालेला अन् साली कट्ट्यावर अस्ताव्यस्त पसरलेल्या! मी चाट पडलो. दारेखिडक्या बंद असतांना घरात रात्री पक्षी? वटवाघूळ? उंदीर? उंदरांचीच शक्यता जास्त, पण साडेतीन फूट उंच कट्ट्यावर ते कसे चढले? की हा भुताटकीचा प्रकार? प्रश्नार्थक मुद्रेनं त्या रात्री झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी पुन्हा तोच प्रकार! मग मध्यरात्री माझ्यातला शेर्लॉक होम्स जागा झाला. मांजरीच्या पावलाने खाली येऊन कट्ट्यावर बेबी पावडरचा लेप पसरवून बियांनी भरलेली बशी त्याच्या अगदी मधोमध ठेवली. उंदीर या दिशेला फिरकावेत म्हणून त्यावर सुगंधी फवाराही मारला. चोर कितीही चलाख असेना, पावलांचे ठसे मला सकाळी नक्कीच दिसणार! विजयी मुद्रेनं झोपी गेलो.

सकाळी उठून पाहतो तो पुन्हा तेच! बिया खतम! पावडरवर पायांचाच काय, पण नखांचाही छाप नाही! माझा युक्तिवाद पराभूत झाल्याने माझा अभिमान दुखावला गेला. भुताटकीची शंका बळावली. दोन दिवस पावडर पसरवूनही चोरांच्या पावलांचे ठसे मिळेनात. भेटीला आलेल्या मित्रांना ही 'भुताटकी' दाखवली. डोकी खाजवली गेली, पण कोडं सुटेना. सूर्यफुलांच्या बिया आता थैलीतून काढून फुटभर उंच अशा कोकच्या प्लॅस्टिक बाटलीत भरल्या. बाटली जवळपास अर्धी भरली व ती तशीच कट्ट्यावर ठेवली.

मध्यरात्री पाणी प्यायला स्वयंपाकघरात आलो. दिवा लावल्याबरोबर एक उंदीर कुठून तरी टुणकन उडी मारून पावडरच्या थराला वळसा घालून कट्ट्याच्या भिंतीलगतच्या उभ्या कठड्यावरून तुरतुरु धावत पसार झाला. चोर उंदीरच आहे याची खात्री झाली आणि मग शांत झोप लागली.

सकाळी उठून पाहतो तर काय? बाटलीत दोन उंदीर! या चतुष्पादांनी अर्धा इंच तोंडाच्या बाटलीत कसा प्रवेश केला हे गूढ अजून उकललं नाही. यावर तर्क चालू आहेत. वाचकांपैकी कोणी मूषक-तज्ज्ञ असल्यास त्यांनी आपली मते मांडावीत. बाटलीतून ते बाहेर आले नाहीत हे नशीब, नाहीतर बाटलीत बियांची टरफलं आणि लेंड्या पाहून उंदीररूपी भुतांवर तुमचा-माझा नक्कीच विश्वास बसला असता.

बाटली बागेत नेऊन जमिनीवर आडवी ठेवली. स्वातंत्र्याची दिशा ओळखून शिताफीनं एकामागून एक असे दोघेही वीर डोकं बाहेर काढून अन् बाहेरची स्वच्छ हवा घेत अंग चोरून पटदिशी बाहेर पसार झाले.

♦♦♦

पान ८ वरून

उत्तर अमेरिका, मध्यपूर्व, जपान व ऑस्ट्रेलियाही होते - बैठकी गाजविणाऱ्या ह्या कलाकाराला साधी बैठक घालूनही बसता येईना. एक वर्ष संगीत बंद होते. तशात १४ मार्च १९९९ ह्या दिवशी Times of India च्या एका मूर्ख वार्ताहराने "The Inimitable Bhimsen Joshi retires" अशी बातमी छापून टाकली. ह्या महाभागाला हेही माहीत नव्हते की एकदोन आठवड्यापूर्वीच स्वरभूषणांनी गायनाचे कार्यक्रम, खुर्चीत बसून का होईना, सुरू केले होते.

कलकत्त्याच्या त्यांच्या भक्तांना तर ह्या बातमीचा इतका राग आला की त्यांनी भीमसेनजींना मानाने बोलवून नगरपालिकेतर्फे त्यांचा एक टोलेजंग सत्कार समारंभ साजरा केला. त्यानंतर खास निमंत्रितांसाठी - त्यात भारतातील जाणकार गायक-वादक होते - त्यांचा एक खाजगी कार्यक्रम एका धनिकाच्या प्रशस्त दिवाणखान्यात केला. धड चालताही न येणाऱ्या व मेंदूवर दोन शस्त्रक्रिया झालेल्या त्या कलावंताचा कलाविलास पाहून श्रोते थक्क झाले. विलायत खाँ म्हणाले, "ह्या स्थितीतही गायनातील सर्व चमत्कृती गळ्यातून निघताहेत." गायन हाच पेशा असणारे आदरणीय गायक व गुरू पं. कानन म्हणाले, "ह्यांचं आजचं गाणं ऐकून आपण आताच गायन शिकायला सुरू केली आहे असं वाटतंय."

भीमसेनजींचा नुकताच ऐकलेला स्वरविलास डिसेंबर २००४ मधे सवाई गंधर्व महोत्सवात. त्यांचा मालकंस ऐकून हर्षभरित झालेल्या श्रोत्यांना वाटले, "आता भीमसेनजी सुधारण्याच्या मार्गावर आहेत." पण अजून साडेसाती संपली नव्हती. २००५च्या महोत्सवात तर ते गायलेही नाही, की महोत्सवाच्या सभागृहात फिरकलेही नाही. १९५३मधे महोत्सव सुरू झाल्यापासून असे कधीही झाले नव्हते. आम्ही त्यांना भेटायला गेलो तेव्हा ते व्हीलचेअरमधे बसले होते. प्रकृती खालावली होती व चेहऱ्यावर नेहमीचे तेज नव्हते. "या वाघमारे" असे म्हणून जे गप्प झाले ते आम्ही दीड तास तेथे असेपर्यंत सुन्न बसून होते. याला अर्थात सबळ कारण होते. त्यांच्या जीवनातील वत्सला नांवाचे संगीत आसमंतात कायमचे विरले होते. "ते घरात सर्वात वडिलधारे असल्यामुळे त्यांना शोकही-व्यक्त करता आला नाही. त्यामुळे प्रकृतीवर जास्त परिणाम होतो," त्यांची मुलगी शुभदा म्हणाली. त्यांची गादी चालविणारा त्यांचा मुलगा श्रीनिवास पलिकडच्या खोलीत रियाझ करीत होता. भविष्याचा सूर भूतकाल ऐकत होता.

भीमसेनजी २००६च्या महोत्सवातही गाऊ शकले नाहीत. पण त्यांची प्रकृती बरीच सुधारली होती. आम्ही तिथीप्रमाणे रथसप्तमीला - २५ जानेवारीला - त्यांचे अभीष्टचिंतन करण्यास गेलो. पूर्वीचे तेज चेहऱ्यावर हळूहळू प्रकटत होते. मी त्यांना त्यांच्या गौरवांजलीचा पूर्वार्ध असलेला जानेवारी २००७ चा 'एकता'चा अंक भेट दिला. मग बऱ्याच चांगल्या गप्पा झाल्या. निघण्याआधी मी त्यांना विचारले, "भीमसेनजी पुढच्या डिसेंबरच्या महोत्सवात गाणार ना?" "हो हो नक्की, तुम्ही दोघं जरूर या." मी त्यांना वाकून नमस्कार केला. त्यांनी (नेहमीप्रमाणेच) आशीर्वाद दिला नाही. अरे हो! सांगायचं विसरलो. पंडितजी कधी कुणाला आशीर्वाद देत नाहीत. "आशीर्वाद देण्याचं काम देवाचं," ते म्हणतात. उगाच नाही ते गातात "जो भजे हरिको सदा, सोहि परम पद पावदा"!

♦♦♦